
## महत्त्वाचे

## आप्पा महाराज निमसे यांनी स्वहस्ते लिहिली तुकाराम गाथा

**सोनई (वार्ताहर)–** संत तुकाराम गाथेतील ४०९२ अभंग



३९ दिवसात सोनई येथील आप्पा महाराज निमसे यांनी वहीवर स्वतःच्या हाताने लिहून काढले असून वारकरी संप्रदायातून निमसे यांचे कौतुक होत आहे. महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला. यासाठी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याने यासाठी ५०० भाविकांना वह्या पुरवल्या होत्या. फक्त ३९ दिवसांत ४०९२ अभंग आप्पा निमसे यांनी वहीवर लिहून काढले. याअगोदर श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या ज्ञानेश्वरी ग्रंथ हस्तलेखन उपक्रमातही निमसे यांनी ५९ दिवसांत ज्ञानेश्वरी ग्रंथ स्वतःच्या हाताने लिहून पूर्ण केला होता. आप्पा निमसे यांना महंत भास्करगिरी महाराज यांच्याहस्ते सन्मानपत्र देण्यात आले होते.

## ज्ञानेश्वर कारखाना पगारदार पतसंस्था मानद सचिवपदी भुसारी

**भेंडा वार्ताहर)–** येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील



ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना पगारदार सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या मानद सचिवपदी संभाजी भुसारी यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेचे अध्यक्ष अनिल शेवाळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाचे सभेत ही निवड करण्यात आली. संस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र मोटे, संचालक विजय गव्हाणे,राजेंद्र वाबळे,केशव जगधने, सचिन निकम, मच्छिंद्र चौधरी, सचिव सुरेश उगले, कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी कल्याणराव म्हस्के, सुनीलकुमार चौघुले, अंबादास गोंडे, शंकरराव भारस्कर आदी यावेळी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेत अवंतिका कांदे प्रथम

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** निशा अबॅकस संस्थेने सोलापूर



येथे राज्यस्तरीय परीक्षेचे आयोजन केले होते. त्यामध्ये अवंतिका गोविंद कांदे हिने प्रथम श्रेणीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या यशाबद्दल एस. के. सोमय्या प्राथमिक विद्यामंदिर शाळेच्या संचालिका तसेच रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या मिनाताई जगधने, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सोनाली पैठणे, वर्गशिक्षक श्री. ताके, श्रीमती मेघा पवार, श्रीमती काळे आदींनी तिचे अभिनंदन केले. तिला संचिता नरोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

## दुर्गादेवी मंदिरात उद्या धार्मिक कार्यक्रम

**नेवासा (शहर प्रतिनिधी)** नेवासा येथील नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून येथे असलेल्या दुर्गादेवी मंदिरात शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी सद्गुरू शंकर महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्यासह भजन सेवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिर पुजारी सुभाष चव्हाण यांनी दिली. दुपारी २ वाजता सद्गुरू शंकर महाराज यांच्या पादुकांचे आगमन होईल, दर्शन सोहळा रात्री ८ वाजेपर्यंत चालेल. तर सद्गुरू शंकर महाराज भजनी मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम निखिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास मंदिर प्रांगणात होईल. पादुकांच्या दर्शनाचा व भजन श्रवणाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन दुर्गादेवी मंदिर भक्त मंडळ व तरुण मंडळ यांच्यावतीने करण्यात आले आहे .

## बेल्हेकरवाडी येथे आजपासून माता भगवती उपासना व धार्मिक कार्यक्रम

**सोनई (वार्ताहर)–** येथून जवळच असलेल्या व देशात काच मंदीर म्हणून प्रसिद्ध असलेल्या बेल्हेकरवाडी येथील ओंकार शक्तीपीठ रेणुकादेवी मंदिरात शारदीय नवरात्र सोहळ्यानिमित्त माता भगवतीची नित्योपासना व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यज्ञेश्वर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान या सोहळ्यास ३ ऑक्टोबर रोजी भगवतीचे नित्य षोडशोपचार पूजन व घटस्थापनेने प्रारंभ होईल. दररोज दुपारी १२:३० वाजता भगवतीची मंगल आरती व प्रसाद, तद्नंतर दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत श्री रेणुका मातेची राजोपचार सेवा होईल व सायंकाळी ७:३० ते ९:३० पर्यंत भगवतीची पंचपदी सेवा, स्तोत्र पठण, दृष्ट, झूला व आरती असा तिथी सप्तमी पर्यंतचा क्रम आहे. महाअष्टमी निमित्त ११ ऑक्टोबर रोजी दुपारी १२:३० वाजता भगवतीचे नित्य पूजन व आरती.सायंकाळी ५ वाजता भगवतीचा भव्य पालखी मिरवणूक सोहळा, तद्नंतर दीपस्तंभ पूजन व कुमारिका पूजन. रात्री १० वाजता भगवतीचे भव्य राजोपचार महापुजन, भजन, जागरण व काकडा आरती होईल. १२ ऑक्टोबर रोजी महानवमी व विजयादशमीच्या दिवशी सकाळी सरस्वती पूजन, दुपारी १२:३० वाजता भगवतीची महाआरती, ६:३० वाजता सिमोल्लंघन होईल. नवरात्रीत भगवतीची कुंकुमार्चन सेवा, विविध भजनी मंडळांद्वारे भजन सेवा होणार आहे. असे रेणुकादरबारच्यावतीने सांगण्यात आले.

# गावठाणासाठी राखीव क्षेत्र द्या

## मुकिंदपूर ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू



**नेवासाफाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर येथील गट नं.७६ मध्ये जिल्हाधिकारी यांनी वाढीव गावठाण विस्तारासाठी राखीव ठेवलेले ४ हेक्टर क्षेत्र कायमस्वरुपी अधिकृत निवासासाठी व त्याठिकाणी शासकीय योजना राबविण्यासाठी ग्रामपंचायतीकडे वर्ग करावे या मागणीसाठी दि. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती दिनी नेवासा फाटा येथील आंबेडकर चौकात ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

उपोषणासंदर्भात एक पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविले आहे. या उपोषणास मल्हार शिंदे, संतोष साळवे, नंदू वाकडे, आनंद साळवे, संदीप सोनवणे, प्रदीप खंडागळे, संदीप जाधव, शिवहरी शिंदे, रमजान शेख, जाफर शेख यांसह अनेक ग्रामस्थ बसले आहेत.

जोपर्यंत आमच्या नावे उतारा देत नाही तोपर्यंत हे आमरण उपोषण चालूच राहणार असल्याचे आनंद साळवे, मल्हार शिंदे, नंदू वाकडे, रमजान शेख यांनी सांगितले आहे.

### उर्वरित प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्यासाठी

# राहुरी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांचे आजपासून उपोषण

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** महात्मा फुले कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्त भरती बाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत मान्य करून आदेशित करण्यासाठी राहुरी येथील उर्वरित प्रकल्पग्रस्त दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ पासून विद्यापीठाच्या मुख्यप्रवेशद्वारासमोर अन्नत्याग आंदोलनास बसणार आहेत, अशी माहिती प्रकल्पग्रस्त कृती समिती महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे अध्यक्ष संतोष पानसंबळ, उपाध्यक्ष विजय शेडगे व सचिव सम्राट लांडगे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या सचिवांना दिलेल्या निवेदनात म्हटले, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या विद्यापीठ स्थापनेवेळी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या गेल्या, अशा प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबातील एका सदस्यास विद्यापीठांमध्ये नोकरीवर सामावून घेण्याची तरतूद आहे. जवळपास ५८४ शेतकऱ्यांच्या २५९८.६९ हेक्टर जमिनी विद्यापीठासाठी संपादित करण्यात आल्या. विद्यापीठ स्थापनेपासून आत्तापर्यंत वेळोवेळी ३५२ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना विद्यापीठ सेवेमध्ये सामावून घेण्यात आले. सद्यस्थितीत विद्यापीठांमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ पदाच्या १६०० पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. उर्वरित प्रकल्पग्रस्तांपैकी काही प्रकल्पग्रस्त शेतकरी वयाच्या मर्यादितून बाद होण्याची वेळ आली आहे. पुनर्वसन अधिकारी अहमदनगर यांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देणे व हस्तांतरित करणे बंद केलेले आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी विद्यापीठासाठी जमिनी दिल्या, त्यांचे शासनाकडून कुठल्याही प्रकारचे पुनर्वसन न करता फसवणूक केली गेली आहे. कृषी विभागाने प्रकल्पग्रस्त भरती बाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करून प्रकल्पग्रस्त भरतीबाबत विद्यापीठांना आदेशित करणे आवश्यक आहे.

## सोयाबीन व मक्याची शासनाने खरेदी सुरू करावी-सभापती नवले

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात हमीभावापेक्षा कमी भावाने शेतमालाची विक्री करावी लागू नये, यासाठी बाजार समितीने सोयाबीन, मका या शेतमालाचे खरेदी केंद्र ठिकठिकाणी सुरू करावेत, यासाठी श्रीरामपूर बाजार समितीने मागणी केली आहे, अशी माहिती सभापती सुधीर नवले यांनी दिली.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा मार्केटिंग अधिकारी आणि जिल्हा सहकार उपनिबंधक यांच्याशी बाजार समितीने पत्रव्यवहार करून मागणी केली आहे. काही व्यापाऱ्यांनी बाजार समितीचे लायसन्स न घेता उधारीवर खेडोपाडी मका व सोयाबीन खरेदी सुरू केली आहे. त्यासंदर्भात शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. अशा व्यवहारांना बाजार समिती जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेण्याचे आवाहन नवले यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

शेतकऱ्यांनी आपला माल बाजार समितीच्या आवारात विक्री करावा, तसेच खरेदी केंद्र सुरू झाल्यावर आधारभूत किंमत योजनेंतर्गत सुरू झालेल्या केंद्रावरच आपला शेतमाल विक्रीसाठी आणावा, असे आवाहनही सभापती सुधीर नवले, प्रभारी सचिव साहेबराव वाबळे आणि संचालक मंडळाने केले आहे.

# मुकिंदपूर ग्रामपंचायतीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

**नेवासा फाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर येथील ग्रामपंचायतीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन आमदार शंकरराव गडाख यांच्याहस्ते करण्यात आले. माजी जिल्हा परिषद अर्थ व पशुसंवर्धन सभापती सुनील गडाख यांच्या विकास निधीतून या इमारतीचे काम करण्यात आले आहे.



अध्यक्षस्थानी लक्ष्मण कराडे होते तर माजी सरपंच पांडुरंग निपुंगे, तुकाराम मिसाळ, नंदकुमार पाटील, रावसाहेब कांगुणे, ॲड.अशोक करडक व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक पोलीस पाटील आदेश साठे यांनी केले. सूत्रसंचालन अशोक गाडे यांनी केले. यावेळी आमदार गडाख यांनी उपस्थित ग्रामस्थांना संबोधित केले. भविष्यात गावच्या विकासासाठी कोणताही निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली. याप्रसंगी लक्ष्मण कराडे, रावसाहेब कांगुणे, नंदकुमार पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले.

भारतीय बौद्ध महासभेच्या अनिता कांबळे, वनिता कांबळे, अर्चना आरले, अलका गजभिव, इंदुबाई ताकवले, भारती यादव, संगीता बर्डे आदी महिलांनी आमदार गडाख यांची भेट घेऊन लेखी निवेदन देत बुद्ध विहारसाठी जागेची मागणी केली. त्यावेळी आमदार गडाख यांनी सतीश निपुंगे यांच्याशी चर्चा करून याबाबतीतील तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर लवकरात लवकर बुद्ध विहारसाठी जागा उपलब्ध करून देऊ,असे आश्वासन दिले.

याप्रसंगी सरपंच कल्पना निपुंगे, उपसरपंच भारती करडक, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक संतोष खंडागळे, कामगार तलाठी आकाश जोशी यांसह सीताराम निपुंगे, गंगाराम निपुंगे, रामकृष्ण कांगुणे, नंदकुमार शेळके, रमेश सावंत, दत्तात्रय शिरसाठ, अरुण देशमुख, बाळासाहेब केदारे, अविनाश साळवे, भिवाजी आघाव, अनिल लहारे, रवींद्र करडक आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. आभार माजी सरपंच सतीश निपुंगे यांनी मानले.

# ६५ वर्षांनंतर राहाता ग्रुप सोसायटीच्या सभासदांची दिवाळी गोड; १५ टक्के लाभांश

**राहाता (वार्ताहर)–** ६५ वर्षांनंतर प्रथमच राहाता ग्रुप सोसायटीच्या सभासदांची दिवाळी गोड होणार असून संस्था नफ्यात आल्याने यावर्षी दिवाळीनिमित्त सभासदांना १५ टक्के लाभांश वाटप करण्याचा निर्णय सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला.

राहाता ग्रुप सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन ज्ञानेश्वर बाबुराव सदाफळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राहाता विविध कार्यकारी सेवा सोसायटी व राहाता ग्रुप सोसायटी या दोन्ही सोसायटींचे कामकाज संचालक मंडळ उत्कृष्टपणे करत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तोट्यात असलेली राहाता ग्रुप सोसायटीच्या नफ्यात वाढ झाल्याने यावर्षी ६५ वर्षांनंतर प्रथमच ग्रुप सोसायटीने सभासदांची दिवाळी गोड करण्यासाठी १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती अध्यक्ष ज्ञानेश्वर सदाफळ, उपाध्यक्ष अंबादास गाडेकर यांनी दिली. या निर्णयाचे सभासदांनी स्वागत केले आहे.



ना. विखे पाटील व डॉ सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची घोडदौड उत्कृष्टपणे सुरू आहे. सभासद व संचालक यांच्या प्रयत्नाने संस्था प्रथमच नफ्यात आल्याने सभासदांना ६५ वर्षांनंतर प्रथमच १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेतला आहे. सभासदांना अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध असून त्यांनी त्याचा फायदा घ्यावा.
– **ज्ञानेश्वर सदाफळ**, अध्यक्ष.

या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी गणेशचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, गणेशचे संचालक ॲड. नारायण कार्ले, ॲड. रघुनाथ बोठे, सोपानराव सदाफळ, वि.वि.का सोसायटीचे चेअरमन सुरेश गाडेकर, नानासाहेब बोठे, संचालक राजेंद्र कार्ले, रावसाहेब लांडगे, चंद्रभान मेहेत्रे, बाबासाहेब मेहेत्रे, बाळासाहेब गाडेकर, शुक्लेश्वर शेळके, नारायण यादव, सर्जेराव भगत, नर्मदाबाई सदाफळ, अनिताताई बोठे, अलकाताई गाडेकर, भाऊसाहेब मेहेत्रे, राजेंद्र कोल्हे, गंगाधर बोठे तसेच सचिव अनिलकुमार मेनगर, संस्थेचे कर्मचारी राजेंद्र वायकर, ज्ञानेश्वर शेटे उपस्थित होते.

## एकरुखेत आजपासून नवरात्र उत्सवास प्रारंभ

**एकरूखे (वार्ताहर)–** साडेतीन शक्तीपीठांचे एकत्रित वसतिस्थान असलेल्या प्रख्यात श्रीक्षेत्र वज्रेश्वरी माता एकरूखे येथे श्री वज्रेश्वरी मातेचा शारदीय नवरात्र महोत्सव आज गुरुवार ३ ते शनिवार १२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये संपन्न होत आहे या कालावधीमध्ये दररोज रोज सायंकाळी कीर्तनाचे आयोजन केले असल्याचे माहिती श्रीराम व ट्रस्टचे कार्यकारी अध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी दिली.

पहाटे ५ ते ६ आरती, सकाळी ९ ते १० वा देवीभागवत पारायण व सायंकाळ ६ ते ७ वा आरती हे दैनंदिन कार्यक्रम असणार आहे. गुरुवार ३ तारखेला दुपारी ३ वा. महंत रामगिरी महाराज यांच्याहस्ते घटस्थापना होईल. यावेळी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, शालिनीताई विखे पाटील उपस्थित असणार आहे.

दुपारी ४ ते ६ या वेळात महंत रामगिरी महाराज याचे हरिकीर्तन तद्नंतर महाप्रसाद होईल. रात्री ९ वा बाळासाहेब राहिंज (वाघे) याचे जागरण होईल. शुक्रवार ४ रोजी रामराव महाराज ढोक नागपूर याचे किर्तन, ५ रोजी ॲड. शंकर महाराज शेवाळे याचे कीर्तन, ६ रोजी महाराज जगताप, ७ रोजी रात्री ज्ञानेश्वर महाराज पठाडे याचे कीर्तन, ८ रोजी भगवान महाराज गडदे (आळंदी) याचे कीर्तन व राजू वाघे डोळस याचा जागरणाचा कार्यक्रम. ९ रोजी प्रदीप महाराज नलावडे, १० रोजी सांस्कृतिक कार्यक्रम, ११ रोजी सकाळी ९ वा. मध्यप्रदेश येथून वज्रेश्वरी प्रतिष्ठानच्या युवकांनी पायी आणलेल्या मशाल ज्योतीचा स्वागत समारंभ होईल. दुपारी ३ वा. होमहवन, रात्री ८ ते १० वेळात दांडिया स्पर्धा होतील. १२ रोजी रात्री ८ वा. विजयादशमी बिरोबा मंदिर एकरुखे व्हईकाचा कार्यक्रम होऊन नवरात्र महोत्सवाची सांगता होईल.

## प्रवरेच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

**राहाता (प्रतिनिधी)–** प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी कृषी शास्त्र संस्थेच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय येथे शुक्रवार ४ व ५ ऑक्टोबर रोजी कृषी जैवतंत्रज्ञान यामधील सद्य स्थिती व भविष्यातील संधी या विषयावरती दोन दिवशीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ.उत्तमराव कदम यांनी दिली.

परिसंवादाचे उद्घाटन शुक्रवार ४ ऑक्टोबर रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठचे अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी कृषी महविद्यालय हळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे तसेच प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुष्मिता विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. यावेळी संस्थेचे सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

या दोन दिवसीय परिसंवादात प्रमुख व्याख्याते म्हणून राष्ट्रीय अजैविक स्ट्रेस संशोधन संस्था, बारामतीचे डॉ. सुशील चांगण, हैद्राबाद येथील इक्रीसॅटचे डॉ. सुनील गांगुर्डे, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. भाऊसाहेब पवार, राष्ट्रीय ऊस संशोधन उपकेंद्र, प्रवरानगर येथील डॉ. योगेश थोरात आदी विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. तरी या परिसंवादात विद्यार्थी, संशोधक यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब घोरपडे यांनी केले.

## पाचेगावात आजपासून हरिनाम सप्ताह

**पाचेगाव (वार्ताहर)–**नेवासा तालुक्यातील पाचेगाव येथे आजपासून नवरात्रोत्सवानिमित्त पारायण व सोहळ्यास प्रारंभ होत आहे. राजाराम महाराज तुवर व योगेश महाराज (आळंदी), संदीप महाराज जाधव (कारवाडी) यांच्या उपस्थितीत सोहळ्यास प्रारंभ होणार आहे.

पहाटे काकडा भजन व विष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, सायं. ५ ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० कीर्तन होणार आहे. शनिवार १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ संदीप महाराज जाधव (कारवाडी) यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर श्री. ज्ञानेश्वर स्वयंसहाय्यता बचत गट, पाचेगावच्यावतीने महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

# पाचेगावच्या विशेष ग्रामसभेत विविध समस्यांवर चर्चा

**पाचेगाव (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील पाचेगाव येथे मंगळवार रोजी गावातील गहिनीनाथ सभामंडप येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन सरपंच वामनराव तुवर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येऊन गावातील विविध समस्यांवर ग्रामसभेत चर्चा करण्यात आली.

करोना काळासून बंद झालेल्या गावातील नेवासा व श्रीरामपूर येथून येणाऱ्या बसेस पूर्ववत सुरू करण्यासाठी पाठपुरावा करुनही बसेस सुरू न झाल्याने भविष्यात वेगळा निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले.

ग्रामस्थांना कर मागणी बील देण्यात यावे, जलजीवन योजनेच्या कामामधून काम न करता ठेकेदारांनी जे पैसे काढले, त्याची चौकशी करून पैसे परत कसे मिळतील त्याबद्दल त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, सांडपाण्यातील घनकचरा नामंजूर करणे, कारण ग्रामपंचायत प्रशासनाने ३० टक्के सहभाग नोंदवून उर्वरित ७० टक्के शासनाकडून अर्थसहाय्य मिळणार, त्यामुळे हा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. गावातील अंगणवाडी दुरुस्ती करण्याबाबत, नियमानुकुल शासनदरबारी प्रस्ताव सादर करणे, २०११ पूर्वी ज्याच्या ग्रामपंचायत उतारा निघतो त्या उताऱ्याप्रमाणे त्या नागरिकांच्या जागा नियमानुकुलीत करण्यात याव्यात, गट नं. ४३० मधील जागेचा प्रश्न देखील सोडवावा, त्या गट नंबर वरील नागरिकांच्या जागा नियमानुकुल करण्यात याव्यात, वाढीव गावठाणचा प्रस्ताव करण्यात यावा, गावामध्ये वनविभागाच्या जागेत नागरिकांना घरकुल बांधण्याच्या परवानगी देण्यात यावी, गावातील सर्व दलीत वस्तीमधील लाभार्थ्यांना ग्रामपंचायत अंतर्गत १५ टक्के निधी उपलब्ध करण्यात यावा, पूर्वी गावामध्ये तीन तांडा वस्ती आहे, त्यात अजून चार-पाच तांडा वस्तीचे वाढीव प्रस्ताव करण्यात आला आहे. गावामध्ये बस सुरू करण्यासाठी पुनतगाव रस्त्यावर एक किलोमीटर रस्ता हा खराब आहे, त्यामुळे लोकवर्गणीतून हा रस्ता तयार करून नेवासा येथून बस सुरळीत चालू होईल, अशा विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

सरपंच वामनराव तुवर, उपसरपंच ज्ञानदेव आढाव, अशोक कारखान्याचे संचालक बाळासाहेब शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष दिगंबर नांदे, उपाध्यक्ष दत्तात्रय पाटील, सोसायटीचे अध्यक्ष भगीरथ पवार, सोसायटीचे माजी अध्यक्ष प्रकाश जाधव, माजी उपसरपंच श्रीकांत पवार, माजी ग्रामसेवक नारायण नांदे, शेतकरी संघटनेचे हरिभाऊ तुवर, धर्मा बर्डे, निवृत्ती जाधव, भास्कर तुवर, रामभाऊ जाधव, रामभाऊ रासकर, ज्ञानेश्वर शेळके, सुनील पारखे, दादा शिंदे, संदीप शिंदे, कचरू साळुंके, शिवाजी राक्षे, ज्ञानेश्वर विधाटे, काशिनाथ साळुंके, ताराचंद शिंदे, फय्याज शेख, ग्रामविकास अधिकारी शिवाजी वाहूरवाघ, सत्तर पटेल, रामेश्वर पवार, उमेश काहर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.